दैनिक
आनंद नगरी

गुरुवार, ४ नोव्हेंबर २०१०	पान ८

# माणूसपण हरवलेल्यांचा शोध घेणारी 'श्रध्दा'

अच्युत मोरे

**जालना–** शहरातील रस्त्यांवर कळकट किंवा फाटकेतुटके कपडे अंगावर असलेली व्यक्ती दिसली तर तिच्याकडे न बघता वाट वाकडी करून जाणे, हीच जगाची रीत आहे. परंतु, मुंबई येथील 'श्रध्दा रिहॅबिलिटेशन फाऊंडेशन' ही संस्था मात्र अशा फाटक्या मनोरुग्णांकडे जाऊन मदतीचा हात पुढे करीत मानवतेचा संदेश देत आहे.


मनोरुग्ण अवस्थेत


उपचारानंतर परिवारासोबत

धावपळीच्या युगात चांगल्या माणसासोबत दोन गोष्टी बोलायला कुणाला वेळ नसतो, त्यात मनोरुग्णांना कोण विचारणार? परंतु, मुंबईचे समाजसेवक डॉ. भरत वटवानी व त्यांच्या पत्नी डॉ. स्मिता वटवानी यांनी मनोरुग्णांना शोधून त्यांच्यावर उपचार करून त्यांना त्यांच्या गावी सोडण्याचे काम हाती घेतले आहे. देशात कुठेही मनोरुग्ण रस्त्यावरून फिरतांना दिसला तर त्याला मदतीचा हात देऊन माणसात आणण्याचे काम श्रध्दा फाऊंडेशनच्या वतीने करण्यात येते. गेल्या २२ वर्षांपासून डॉ. भरत वटवानी व त्यांच्या पत्नी डॉ. स्मिता वटवानी सामाजिक कार्यात अग्रेसर आहेत.

चांगल्या माणसांची सेवा करणारे आपल्याला पाहायला मिळतात. परंतु, मनोरुग्णांकडे कुणीही लक्ष देत नाही. अशा मनोरुग्णास दोन घासांऐवजी मार मात्र हक्काने मिळतो. हे विदारक दृष्य वटवानी परिवाराला पाहवेना. म्हणून त्यांनी सहा वर्षांपूर्वी वेजणगाव, कर्जत, जि. रायगड येथे श्रध्दा रिहॅबिलिटेशन फाऊंडेशनची स्थापना केली.


मनोरुग्ण अवस्थेत


उपचारानंतर परिवारासोबत

या फाऊंडेशनच्या माध्यमातून मनोरुग्णास संस्थेत आणले जाते व त्याच्यावर उपचार करून त्यास पुन्हा गावी सोडले जाते. फाऊंडेशनच्या स्थापनेपासून डिसेंबर २००९ पर्यंत १ हजार ५०० रुग्णांवर उपचार करून त्यांना गावी नेऊन सोडण्यात आले आहे. तर जानेवारी २०१० पासून ऑक्टोबर २०१० पर्यंत २०२ मनोरुग्णांवर उपचार त्यांनी केले आहेत. रुग्णांची सेवा करण्यासाठी डॉ. वटवानी दाम्पत्यासह इतर दोन निवासी डॉक्टर व १० सामाजिक कार्यकर्ते कार्यरत आहेत. ज्या ठिकाणी मनोरुग्णांची संख्या जास्त असेल तेथे जनजागृती करून मनोरुग्णांवर उपचार करण्यास प्रवृत्त केले जाते. या संस्थेत केवळ अनाथ मनोरुग्णांवरच उपचार केले जातात. ज्या मनोरुग्णांचे नातेवाईक आर्थिकदृष्ट्या सक्षम आहेत, त्यांना मात्र इथे प्रवेश दिला जात नाही. या ठिकाणी केवळ अनाथ व गरीब व्यक्तींनाच प्रवेश देऊन कपडे, जेवण व वैद्यकीय सेवा पुरविल्या जातात. त्यामुळे ज्यांचे या जगात कुणी नाही, त्यांची 'श्रध्दा' आहे, असे म्हटले जाते. मानवी जन्म मिळूनसुद्धा मुक्या प्राण्यांपेक्षाही हीन जीवन जगणाऱ्या व्यक्तींना किंवा मनोरुग्णांना श्रध्दा फाऊंडेशन माणूस म्हणून जगण्याची उमेद देत आहे. श्रध्दा फाऊंडेशनच्या वतीने वेजणगाव, कर्जत, जि. रायगड व बोरीवली, मुंबई–०२२–२८९५५०२०, ६५८५२६२८ येथे मनोरुग्णांवर विनामूल्य उपचार केले जातात. या अभिनंदनीय कार्याबद्दल सर्वच स्तरातून श्रध्दा फाऊंडेशनचे कौतुक होत आहे.

> श्रध्दा फाऊंडेशनच्या वतीने जालना शहरातील बालाजीनगर येथील गरीब मनोरुग्ण महिलेवर उपचार करण्यात आले व ती पूर्णत: बरी झाल्यानंतर दि. २ नोव्हेंबर २०१० रोजी या महिलेस तिच्या कुटुंबियांकडे सोपवण्यात आले.